संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६१०१६१-६५/२२६५२२५१/५७/५९ संकेतस्थळ: https://www.med-edu.in & https://www.dmer.org

कालमर्यादा/तात्काळ

DMER-15023/5/2022/EST-3 2602

दिनांक -०६/०५/२०२२

प्रति,
अधिष्ठाता / अधिक्षक / अधिक्षीका / सहयोगी प्राध्यापक,
सर्व शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालये व संलग्नीत
रुग्णालये तथा आरोग्य पथके, महाराष्ट्र राज्य.

विषय - समुपदेशनाव्दोर गट-क (अतांत्रिक) संवर्गातील बदलीपात्र कर्मचा-यांच्या यादया प्रसिद्ध करण्याबाबत.

संदर्भ - ०१. बदली अधिनियम - २००५
०२. शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२, दिनांक ०९ एप्रिल २०१८

संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांमधील बदली अधिनियम - २००५ मधील तरतूदीनुसार बदलीस पात्र असलेल्या अतांत्रिक संवर्गातील कर्मचाऱ्यांची यादी संचालनालयाच्या "www.med-edu.in" या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. त्याचे अवलोकन करण्यात येवून काही दुरुस्ती असल्यास संचालनालयास अवगत करण्यात यावे.

बदलीस पात्र यादीतील कर्मचाऱ्यांचे १० पसंतीक्रमाचा विकल्प प्राप्त करुन घेवून संस्थास्तरावर जतन करण्यात यावेत व सोबत जोडलेल्या यादीच्या एक्सेल शीटमध्ये आपल्या संस्थेतील कर्मचा-यांनी दिलेल्या विकल्पाची नोंद टंकलेखीत करुन यादी दिनांक १३.०५.२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विनाविलंब संचालनालयाच्या "ड" कार्यासनाच्या "dbranchdmer@gmail.com" या ई-मेलवर " प्रशासकीय बदली-गट क (अतांत्रिक)-२०२२ " असा विषय नमुद करण्यात येवून त्याची हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी संचालनालयास सादर करण्यात यावी.

सदर माहिती हेतूपुरस्सर चुकीने अथवा विलंबाने सादर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहिल याची नोंद घेण्यात यावी.

संचालक
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई